# साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे महामंडळ, मुंबई.

## ई- निविदा सूचना २०२५-२०२६

| अ. क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फार्म फी ना परतावा | तांत्रिक सल्लागार नोंदणी वर्ग | एम्पानेलमेंट मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | साहित्यरत्न लोकशाहिर अण्णा भाऊ साठे विकास महामंळाचे विविध कामे करणे साठी या कामास वास्तुविशारद (तांत्रिक सल्लागार ) नेमणे. | 25,000 | 2,500 | योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत | ५ वर्ष |

निविदा प्रक्रिया

| अ. क्र. | निविदा प्रक्रिया | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | | पर्यंत | |
| १. | निविदा प्रकाशित करणे. | 28/02/2026 | 10.00 | 9/03/2026 | 15.00 |
| २. | निविदा सादर (अपलोड) | 28/02/2026 | 10.00 | 9/03/2026 | 15.00 |
| ३. | तांत्रिक बोलीचा लिफाफा शक्यतो | 10/03/2026 11.00 | | | |
| ४. | वित्तीय बोलीचा लिफाफा | 13/03/2026 11.00 | | | |

अटी व शर्ती –

| | |
|---|---|
| १. | वास्तुविशारद निविदाकाराने अटी व शर्ती वाचणे आवश्यक आहे आणि त्या मान्य असल्यावरच निविदा दाखल कराव्यात किंबहुना निविदा भरल्यास निविदाकारास अटी व शर्ती मान्य असल्याचे मानण्यात येईल.<br>महामंडळाच्या महाराष्ट्रातील कुठल्याही कार्यक्षेत्रात काम असल्यास ते काम करणे वास्तुविशारद यांना त्यांनी दिलेल्या सेवा नुसार करणे करणे क्रमप्राप्त राहील, तसेच सदर कामासाठी त्या कामाचे स्ट्रक्टरल ऑडिट, ऑनलाईन मंजुरी आणि इतर शासकीय मंजुरी आवश्यक असल्यास प्राप्त करणे व त्या संबंधित अहवाल सादर करणे बंधनकारक असेल. |
| २. | जी. एस.टी. कराचा विचार करुनच दर सादर करावेत. सादर केलेल्या दरावर महामंडळ कुठलाही जादाचा कर अदा करणार नाही. |
| ३. | ई-निविदा द्वि लिफाफा (तांत्रिक व आर्थिक) ऑनलाइन पद्धतीने सादर करावयाची आहे. |

| | |
|---|---|
| ४. | निविदाकाराने वास्तुविशारद खालील नमुद केलेले सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे.<br>१. नोंदणी प्रमाणपत्र – COA बंधनकारक<br>२. निविदा फॉर्म की ची मुळ प्रत तसेच बयाणा रकमेची प्रत<br>३. पैन कार्ड<br>४. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र<br>५. अनुभव प्रमाणपत्र<br>६. परिशिष्ट ब<br>७. प्रतिज्ञा पत्र |
| ५. | तांत्रिक लिफाफ्यातील सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्या-या वास्तुविशारद यांचेच आर्थिक लिफाफा उघडणेत येईल, अन्यथा निविदाकारास अपात्र ठरविण्यात येईन. |
| | निविदेसोबत वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी कौन्सिल ऑफ architecture चे मुदत असलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. याव्यतिरिक्त निविदा रद्द करणेत येतील. |
| | निविदे सोबत दिलेले प्रतिज्ञा पत्र व परिशिष्ट 'ब' या सोबत दिलेल्या नमुन्या प्रमाणेच सादर करावे लागेल त्यात कोणताही बदल करता येणार नाही. तसेच कुठल्याही प्रकारचा बदल केल्यास निविदा फेटाळण्यात येईल. |
| | निविदेसोबत वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी चार्टर्ड अकॉउंट यांचे स्वाक्षरींकीत ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र दाखल करावे तसेच नेट वर्थ प्रमाणपत्र जोडावे. ज्यांचे टर्नओव्हर १ करोड पेक्षा अधिक आहे त्यांनी फक्त सहभाग नोंदवावा. याव्यतिरिक्त निविदा रद्द करणेत येतील.<br>निविदेसोबत वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी प्रोफेशनल व्यायवसायिक कर भरलेल्या ४ वर्षाच्या पावत्या सादर करावयात. याव्यतिरिक्त निविदा रद्द करणेत येतील. |
| | आर्थिक लिफाफा मध्ये दरपत्रक सादर करावे. तसेच दर सादर करताना सर्व करांसहित दर सादर करावे. महामंडळ कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त दर किवा रक्कम अदा करणार नाही. |
| | मंजूर निविदा धारकाची बयाणा रक्कम ही सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महामंडळ मध्ये जमा असेल. तसेच एकूण १% सुरक्षा अनामत बिलातून कपात करणेत येईल. |
| | मंजुर निविदा धारकाला शासनाच्या नियमानुसार मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन द्यावा लागेल. |
| | अत्यावश्यक काम निघाल्यास मक्तेदारास ते तात्काळ करून दयावे लागेल. |
| | वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारचे काम समाधानकारक नसल्यास महामंडळाने प्रकल्प वास्तुविशारद/व्यवस्थापन सल्लागारकडुन काम काढुन घेतल्यात भरलेनी सुरक्षा अनामत महामंडळ जप्त करुन घेईल व ती कुठल्याही परिस्थितीत परत करणार नाही. |
| | वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारला कार्यादेश मिळाल्यावर लगेच काम सुरु करावे लागेल तसेच मुदतीत काम पुर्ण करून द्यावे लागेल तसेच मुदतवाढ देण्याचा सर्वस्वी अधिकार महामंडळाचा असेल. |
| | महामंडळाने सोपविलेले अत्यावश्यक कामे विहित वेळेत पुर्ण करणे आवश्यक राहील तसे न केल्यास योग्य तो दंड आकारण्याचे अधिकार महामंडळाचे राहतील. |
| | सदरचा करारनामा किंवा कामा बाबत केव्हाही व कोणताही प्रकारचा बाद निर्माण झाल्यास महामंडळेचा निर्णय अतिम राहीन. |
| | सदरचे कामास कमीत कमी 3 निविदा प्राप्त न झाल्यास निविदासाठीची मुदत वाढविणे किंवा फेर निविदा बोलविणे अगर आलेल्या निविदापैकीच निविदा मंजूर करणे बाबतचा महामंडळेचा निर्णय अतिम राहील. |

१. वास्तुविशारद निविदाकार हा कोणत्याही सरकारी/निमसरकारी यांनी बंदी केलेल्या काळ्या यादीत नसावा.

२. कामाचे देयक महामंडळेच्या आर्थिक क्षमतेनुसार अदा केले जाईल. उशीर झाल्यास बिलावर व्याज देण्यात येणार नाही. तसेच याकामी अग्रिम रक्कम दिली जाणार नाही.

३. वरील कामावर कार्यकारी संचालक व व्यवस्थापक संचालक यांना देखरेख करण्याचा अधिकार राहील.

४. सदर कामकाज पूर्ण होईपावेतो कोणतेही प्रकारचे दर वृद्धी, Price Escalation देय नाही.

५. सदर काम स्वतः वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पूर्ण करेल. ते दुस-या मक्तेदार/ठेकेदारास सोपविणार नाही किंवा पोट मक्ता देणार नाही व असे आढळल्यास वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचा कार्यादेश रद्द करण्यांत येईल.

६. महामंडळाला वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारचे काम समाधानकारक न वाटल्यास 7 दिवसांची पूर्व सुचना देवून महामंडळ सदरचे काम काढून घेईल. त्याबद्दल वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास कोणत्याही प्रकारची तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही.

७. वेळोवेळी शासन निर्णयानुसार देय शासन कर बिलातून कपात करणेत येतील.

८. वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारकडे लावलेल्या कर्मचा-याचा महामंडळ सेवेत कुठलाही हक्क राहणार नाही.

९. निविदा सुचने मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती देखील वास्तुविशारद यास बंधनकारक राहतील.

१०. महामंडळ तर्फे आपणास नमुद कामासाठी आदेश मिळताच तातडीने / जलदरित्या सदर काम पुर्णत्वास नेणे आपणावर बंधनकारक राहीलः तसे न केल्यास योग्य तो दंड आकरण्याचे अधिकार महामंडळाचे राहतील.

११. काम विहित वेळेत नकेल्यास / कामात आपणाकडून हलगर्जीपणा झाल्यास / हयगय झाल्यास / कारणे दाखवल्यास / कामचुकारपणा केल्यास आपणाकडून सदर काम काढून घेण्याचे तसेच नेमणूक रद्द करणेचे तसेच कारवाई करणेचे अधिकार महामंडळाचे राहतील.

१२. वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मुळ कार्यादेशापासून पुढील 5 वर्षा करीता पॅनलची नेमणूक करण्यात येईल. परंतु कोणत्याही क्षणी व कोणतेही कारण न - देता कोणत्याही वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची किंवा संपूर्ण पॅनल ची नेमणूक रद्द करून नवीन वास्तुविशारद /प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणेचे अधिकार महामंडळेला असतील.

१३. वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणूक झाल्यानंतर नेमणूक केलेल्या पॅनल मधील वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना काम देण्याचे / वाटपाचे संपूर्ण अधिकार हे महामंडळाचे राहतील, पॅनल वर नेमणूक झाली म्हणून काम देण्याचे कोणतेही बंधन महामंडळावर असणार नाही.

१४. आलेल्या निविदा यांची छाननी करणे व पात्रता तपासणे तसेच तुलनात्मक अहवाल करणे, करारनामा करणे, कार्यादेश देणे ह्या सर्व कामांमध्ये योग्य तो सल्ला देणे / अभिप्राय देणे बंधनकारक राहील.

१५. प्रत्यक्ष काम सुरू करण्यापूर्वी अभियंता किवा संबंधीत विभाग प्रमुख यांचेशी चर्चा करून कामाचे नियोजन करावे. तसेच अभियंता यांचे समवेत लाइन आऊट देणे, प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवणे व अभियंता यांना वेळोवेळी कामाच्या प्रगती बाबत अवगत करणे, ठेकेदारामार्फत काम सुरू असताना नियमानुसार कामे होत आहेत यांची खात्री करणे तसेच कामांमध्ये काही त्रुटी असल्यास किवा काही सुधारणा आवश्यक असल्यास त्या सुधारणा किवा त्रुटींची पूर्तता अभियंता किवा संबंधीत विभागप्रमुख यांच्या सहकार्याने वास्तुविशारद यांनी करून घेणे.

१६. काम सुरू करण्यापूर्वीचे फोटो, काम सुरू असतानाचे फोटो तसेच काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो काढून ते अभियंता यांचेकडे / महामंडळेकडे जमा करणे बंधनकारक राहील.

१७. ठेकेदारांकडून काम सुरू असताना शासनाच्या नियमानुसार कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य यांचे चाचणी अहवाल ठेकेराकडून वेळेत प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. याकामी अभियंता / संबंधीत विभागप्रमुख यांची मदत घ्यावी. तसेच विकास काम गुणवत्ता पूर्वक पूर्ण होईल याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

१८. ठेकेदार यांनी कामाचे देयक सादर केल्यानंतर देवकाची तपासणी प्रत्यक्ष झालेल्या कामानुसार करणे व देयक अंतिम तपासणी करीता अभियंता यांचेकडे सादर करणे.

१९. विकास कामे पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या नियमानुसार कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण (लागू असल्यास) करणे आवश्यक असल्यास त्यासंबंधी कामेबाबत अभियंता यांना सहकार्य करणे व पाठपुरावा करणे. तसेच त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण यंत्रणेने जर त्रुटी काढल्या असतील तर अभियंता यांचेशी चर्चा करून त्या त्रुटींची पूर्तता संबंधीत ठेकेदार याच्याकडून करून घेणे.

२०. सदर कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदा पैकी पॅनलवर नेमणूक करणेचे संपूर्ण अधिकार हे महामंडळाचे राहतील. ई-निविदा सादर केली म्हणून पॅनलवर नेमणूक करण्याचे कोणतेही बंधन महामंडळावर राहणार नाही.

२१. उपरोक्त नमुद केलेल्या अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटीचा भंग वास्तुविशारद कडुन झाल्यास योग्य ती कारवाई करण्याचा किंवा सदरचे काम काढुन घेण्याचा अधिकार महामंडळाचा राहील. त्यास वास्तुविशारद ची कोणतीही तक्रार राहणार नाही.

२२.

**व्यवस्थापकीय संचालक**
**साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ**
**साठे महामंडळ, मुंबई.**

**रु. १०० चे स्टॅम्प पेपर** Affidvit

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी_________________________________(नाव, पत्ता, संस्थेचे नाव) खालील सही करणार प्रतिज्ञा पुर्वक लिहून देतो/देते की, विकास कामांचे अंदाजपत्रक, तांत्रिक मंजुरी, कामाचे पर्यवेक्षण इ. करिता तांत्रिकदृष्ट्या सक्षम संस्थेची नियुक्ती करणे या कामाची निविदा सादर करीत आहे. सदर निविदा सुचनेतील व निविदा नमुन्यातील नमुद केलेल्या सर्व अटी शर्ती मी वाचलेल्या असून त्या सर्व अटी शर्ती मला मान्य आहेत.

माझ्या संस्थेचे नाव केंद्रशासन अथवा राज्यशासन याचंकडून कधीही काळ्या यादीत टाकण्यांत आलेले नाही तसेच माझ्या संस्थेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा नाही. तसेच माझी निविदा मंजूर झाल्यास मी प्रामाणिकपणे व पूर्ण क्षमतेने निविदेतील नमुद काम पार पाडेल, याबाबत माझे कडून कोणतीही हयगय अथवा निष्काळजीपणा झाल्यास महामंडळ यांचे होणारे नुकसान मी स्वः खर्चाने भरून देईन. शासनाच्या हितास बाधा पोहचेल असे कोणतेही वर्तन भी करणार नाही.

वरीलप्रमाणे सर्व मजकुर हा सत्य असून तशी बाब आढळून आल्यास मो सादर केलेली निविदा रद्द होईल व त्या बाबत होणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहिल. याबाबत मी कोणत्याही प्रकारची तक्रार करणार नाही, हे मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देत आहे.

सही व संस्थेचा शिक्का

**परिशिष्ट – ब**

**प्रतिज्ञापत्र**

मी. ____________________ वय वर्षे ____ वर्ष, राहणार - ________________ ___________ या सत्य प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देतो की, **कामाचे नावः - ________________** _________________________________या कामास तांत्रिक सल्लागार नेमणे या कामाच्या निविदासाठी मी सादर केलेले सर्व कागदपत्रे सत्य असून व परिपूर्ण आहेत. सदर कागदपत्रांमध्ये त्रुटी किंवा चूक, खोटी व दिशाभूल करणारी नसून या कागदपत्रामध्ये काही चुकीची माहिती नाहीत असे शपथपूर्वक मान्य करीत आहे. खोटी / चुकीची माहिती आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

**निविदाधारकाचे नावः -**

**पत्ताः -**

**दिनांकः** **निविदाधारकाची स्वाक्षरी**

**साक्षीदाराचे नावः -**

**पत्ताः -**

**दिनांकः** **साक्षीदाराची स्वाक्षरी**